# नि ष्क र्ष

....

## ५ निष्कर्ष

१९४२ मध्ये अखिल भारतीय स्तरावर स्वातंत्र्य चळवळीत गांधीजींची असहकार, सत्याग्रह, कायदेभंग ही अंदोलने एवढी प्रभावी होती की सबंध सातारा जिल्हा या चळवळीच्या प्रभावापासून लांब राहू शकला नाही. त्याच प्रमाणे सत्यशोधक समाजाचा व गांधीजींच्या आवानाचा परिणाम म्हणून सातारा भागातील सर्व सामान्य स्त्रियांमध्येही राजकीय जाणीवा निर्माण होऊन त्या चूल व मुल हे कर्तव्य बाजूला ठेवून, पुरुषप्रधान कुटुंब व्यवस्थेच्या मर्यादा ओलांडून चळवळीत सामील झाल्या होत्या.

या शोधनिबंधासाठी माहिती गोळा केल्यानंतर संशोधनाअंती असे आढळते की प्रतिसरकारच्या चळवळीत, स्त्रीया सहभागी होण्यासाठी वेगवेगळे घटक कारणीभूत ठरले. तसेच असेही आढळले की, बहुतेक स्त्रीया या त्यांच्या सामाजिक मागासलेपणा व सरंजामी व्यवस्थेत होणाऱ्या शोषणामुळे सहभागी झाल्या.होत्या. एकट्या इंदुमती पाटणकर सोडल्या तर इतर बहुतेक स्त्रियांच्या माहेरची व सासरची राजकीय चळवळीची पार्श्वभूमी नसताना त्या या लढ्यात सहभागी झाल्याचे आपणास दिसते. सरंजामी व्यवस्थेमध्ये या स्त्रियांचे स्थान केवळ चूल व मुल यापर्यंतच मर्यादित होते. या स्त्रीया ग्रामीण अर्थव्यवस्थेतील सरंजामी व्यवस्थेशी बांधल्या होत्या. त्या पतीबरोबर व त्यांच्या सर्व कुटुंबियासह सावकाराच्या दुष्ट चक्रात सापडल्या होत्या. या स्त्रिया सर्व साधारणपणे स्वतंत्र नव्हत्या. अप्रत्यक्षपणे सरंजामशाही व्यवस्थेत त्यांची पिळवणूक होत होती. माहेरी व सासरी दोन्हीकडे या स्त्रियांना स्वतंत्र अस्तित्व नव्हते. घरकाम, मुले सांभाळणे, शेतीत राबणे हे तिच्यावर सक्तीचे होते. स्वतंत्र विचार करायला, मांडायला वा प्रश्न विचारायला त्यांना मज्जाव होता. या सर्वाबरोबरच सावकाराकडूनही त्यांची आर्थिक

पिळवणूक होत होती. एकीकडून सावकाराच्या कर्जाचा वाढता बोजा व त्यातून होणारे शोषण आणि दुसरीकडे साम्राज्यशाहीने चालविलेला छळ या दोन सामाजिक आर्थिक परिस्थितीच्या रेट्यामुळे सातारा जिल्ह्यातील स्त्रिया या चळवळीत सामील झाल्याचे आपणास आढळून येते.

या प्रबंधासाठी, स्त्रियांच्या मुलाखती घेत असताना, संशोधनाअंती असे आढळून आले की, साताराच्या प्रतिसरकारच्या आंदोलनातील स्त्रियांचा सहभाग हा दोन प्रकारचा होता. एक म्हणजे तो सहभाग प्रत्यक्ष स्वरूपाचा होता व दुसरा अप्रत्यक्ष स्वरूपाचा होता. हा अभ्यास करताना असे आढळले की अगदी थोडया स्त्रियांनी प्रत्यक्ष स्वरूपात या चळवळीत भागीदारी केली. त्यात निदर्शने करणे, फे-या काढणे, हत्यारांची वाहतूक करणे व ती हत्यारे भूमिगत कार्यकर्त्यांना पोहोच करणे. लूटीतील पैसा सांभाळणे व पोहोच करणे. पोष्ट लुटणे, फितुरी करणा-याला शिक्षा देणे, राष्ट्रीय वृत्ती वृध्दींगत होईल असे सभेत भाषण करणे. याशिवाय सातारा जिल्ह्यातील सेवादल हे प्रतिसरकारला पुरक असे कार्य करीत असल्याने सेवादलात कार्य करणा-या स्त्रियाही आढळल्या. या मुलाखतीतून मला जहाल, (क्रांतीकारी) विचारसरणीची एक स्त्री आढळली. तर बाकीच्या स्त्रियांनी गांधीजींचा अहिंसात्मक मार्ग अवलंबिला होता. तरीही प्रत्यक्ष घातपाती कृत्यात तीन स्त्रियांनी भागीदारी केल्याचेही मला आढळले.

अप्रत्यक्षपणे चळवळीस मदत करणा-या व स्त्रियांची संख्या पुष्कळ आहे. त्यांचे काम मुख्यत्वे भूमिगतांना आश्रय देणे, जेवायला घालणे, निरोप पोहोचविणे या स्वरूपाचे होते.

प्रतिसरकारच्या चळवळीत अगदी मोजक्याच स्त्रिया पूर्णवेळ कार्यकर्त्या होत्या. तर आपला बराचसा वेळ प्रतिसरकार अंतर्गत कार्यासाठी देणाऱ्या स्त्रियाही थोड्याच होत्या. मात्र कित्येक स्त्रिया आपले घरकाम व रोजची कर्तव्ये सांभाळून चळवळीस मदत करीत होत्या असे दिसते.

प्रतिसरकारच्या चळवळीत भागिदारी केलेल्या स्त्रिया सामान्यपणे ग्रामीण भागातील होत्या. तसेच त्या उच्च जातीय होत्या. अधिकांश त्या मराठा कुणबी समाजातील होत्या. या चळवळीत प्रत्यक्षपणे भागिदारी करणारी एकच स्त्री दलित समाजातील आढळली. या चळवळीत भागिदारी केलेल्या स्त्रिया या सामान्यपणे १२ ते २४ या वयोगटातील होत्या. तर अपवादाने एखादी प्रौढ स्त्री सुध्दा आढळली. यातील बऱ्याचशा स्त्रियांचे स्थान चूल आणि मूल इथपर्यंतच मर्यादित होते. कुटुंब व व्यवस्थेत तिचे स्थान दुय्यम होते व या चळवळीतील सर्वच स्त्रिया पितृसत्ताक कुटुंबपध्दतीतील होत्या.

तसेच सामान्यपणे या स्त्रिया स्वतःच्या घरात घरकाम करणाऱ्या होत्या. स्त्री कारागीर क्वचितच होती. आणि अप्रत्यक्ष सहभागी झालेल्या शेकडो शेतमजूर स्त्रिया होत्या, असे मला या स्त्रियांची प्रत्यक्ष मुलाखत घेताना आढळून आले.

या अभ्यासात महत्त्वाची गोष्ट लक्षात आली, ती म्हणजे साम्राज्यशाहीचा वाढता अत्याचार व दडपशाहीमुळे चळवळीतील स्त्रियांच्या राष्ट्रवादाबद्दलच्या राजकीय जाणीवा अधिक घट्ट होऊन त्या निर्भयपणे अभिव्यक्त होत होत्या. उदा. भूमिगताने हजर व्हावे म्हणून, पोलीस यंत्रणा क्रांती-

कारकांच्या घरातील स्त्रियांना तुरुंगवासात ठेऊन त्यांचा अमानुष छळ करीत असे. यात साम्राज्यशाही विरोधी कृत्याबद्दल तुरुंगवास झालेल्या स्त्रियाही होत्या. ब्रिटीशांच्या कारकीर्दीत चळवळ दडपून टाकण्याची पध्दत क्रूरतेची व निर्दयी होती. पोलीसांनी भूमिगत कार्यकर्त्यांच्या पत्नीस मारहाण केल्याचेही समजले, एवढेच नव्हे तर चौकशीसाठी, भूमिगत कार्यकर्त्यांच्या पत्नीस मुद्दाम बाहेर नेऊन पोलीसांनी बलात्कार केल्याचेही भयानक सत्य उजेडात आले. पण तुरुंगवासात असताना तुरुंगातही या स्त्रिया निदर्शने करीत असत, असे मला त्यांच्याकडून समजले.

चळवळी अंतर्गत सामाजिक परिणामाचा भाग म्हणून प्रतिसरकारच्या कार्यकारीणीत एकही स्त्री सदस्य नव्हती. न्यायमंडळात वाळवा गटात फक्त एका स्त्रिचा समावेश होता. प्रतिसरकारचे कार्यक्रम हे केवळ जनतेसाठी नव्हते. तर त्याचे अनुकरण करुन चळवळीतील दोन स्त्री कार्यकर्त्यांनी "गांधी-लग्न" पध्दतीने स्वतःचे विवाह केले होते.

चळवळीतील सामाजिक संबंध पूर्णपणे निकोप होते असे म्हणता येणार नाही. कारण चळवळीतील स्त्री कार्यकर्त्यांच्या मुलाखतीतून असे लक्षात आले की, ब्राम्हण स्त्री कार्यकर्तीकडून दलित स्त्री-कार्यकर्तीस जातीभेदाचा अनुभव आला. तर ब्राम्हण स्त्रियांनी आपण तुरुंगातही जातीभेद पाळीत होतो याची प्रांजलपणे कबुली दिली.

तरीही या चळवळीतील सामाजिक परिणामाचा भाग म्हणून उच्च वर्णीय व जातीय कार्यकर्तीने अस्पृश्यता निवारण्यासाठी तुरुंगामध्ये राहणीमानातील फरक, सामाजिक उच्चनिचता यांना नाकारुन राजकैदी म्हणून

मिळालेल्या सवलतीचा कायदा इतर स्त्रियांनाही करुन दिला.

या चळवळीचा क्रान्तीकारी स्त्रियांच्या सामाजिक दर्जावर विपरीत परिणाम झाल्याचेही निदर्शनास आले. उदा. घराकडे पाठ फिरवून चळवळीत सहभागी झालेल्या स्त्रीला घरातून प्रचंड विरोध झाला. समाजातील लोकां-कडूनही दूषीत नजरेने त्यांच्याकडे पाहिले गेले. या स्त्रियांच्या घरावर समाजाने बहि:ष्कार टाकला होता. पण तरीही घाबरुन न जाता स्त्रियांच्यात राष्ट्रीय वृत्ती जोपासण्याचे कार्य हळू हळू या चळवळीतील स्त्री कार्यकर्त्यांनी केले. तर लग्नानंतर पतीला त्याच्या चळवळीतील कार्याबद्दल विरोध करणाऱ्या स्त्रिया, या त्यांच्यात राजकीय जाणीव निर्माण होऊन पुढे पतीच्या कार्यात मदत करु लागल्याचेही आढळले.

या चळवळीचा सामाजिक दुष्परिणाम म्हणून, चळवळीनंतर स्त्री कार्यकर्त्यांना लग्न करण्यासाठी अडचणी आल्या.

अशा तऱ्हेने साताऱ्याच्या प्रतिसरकारच्या चळवळीतील स्त्रीयांचे योगदान तत्कालीन संदर्भात अतिशय महत्त्वाचे वाटते. त्याचबरोबर प्राप्त परिस्थितीत सुध्दा या विभागात स्त्रियांच्या प्रश्नाभोवती, स्त्रियांच्या अनेक चळवळी उभारली आहेत. या चळवळीला या क्रान्तीकारी स्त्रियांच्या राजकीय जाणीवांचा निश्चित वारसा मिळाला असेल, परंतु त्यासंबंधी आणखी संशोधन होणे आवश्यक आहे.

.....

## संदर्भ सूची

### मराठी ग्रंथ: —


| | | |
|---|---|---|
| १. | भागवत कमल व इतर | स्त्री चळवळीची वाटचाल, प्रागतिक प्रकाशन, पुणे १९८५. |
| २. | गव्हाणकर रोहिणी | मराठी स्त्री शक्तीचे राजकारणी रूप आदित्य प्रकाशन, पुणे १९८१. |
| ३. | गोखले पु.पां. | जागृत सातारा, लोकसेवा संघ सातारा, द्वितिय आवृत्ती १९६६. |
| ४. | जावडेकर श.द. | आधुनिक भारत, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, द्वितिय आवृत्ती १९५३. |
| ५. | केळकर श्रीपाद | छोडो भारत १९४२, कान्टिनेन्टल प्रकाशन, १९८३. |
| ६. | केतकर कुमार | कथा स्वातंत्र्याची, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे, १९८५. |
| ७. | कुलकर्णी ल.ग. | साताराचे प्रतिसरकार स्वातंत्र्य लढयाच्या स्मृती. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, पुणे १९८८. |
| ८. | खोबरेकर वि.गो. | इंग्रजी सत्तेविरूध्द महाराष्ट्रातील सशस्त्र उठाव; पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९५९. |
| ९. | कंटक प्रेमा | सत्याग्रही महाराष्ट्र, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पुणे १९४०. |

१०· लाड जी·डी· — पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य भारती विद्यापीठ प्रकाशन, पुणे १९८१·

११· लोहार द·ब·/ आडमुठे ना·दा· — स्वातंत्र्याचा संग्राम १९३० ते १९४२· प्रकाशन- द·ब· लोहार, बिळाशी, जि·सांगली, १९८२·

१२· पाटील विलास — क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांतिसिंह विश्वस्त मंडळ, हणमंतवाडीये, जि· सांगली, १९८१·

१३· पाटील रा·तु· — क्रांतिसिंह नाना पाटील जिवित आणि तत्वज्ञान सन्मित्र प्रकाशन, कोल्हापूर, १९८४·

१४· पाटील उत्तमराव — क्रांतिपर्व, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ ग्रंथालय, मुंबई, १९८७·

१५· पवार जयसिंग — संपादित क्रांतिसिंह नाना पाटील, अरुंधती प्रकाशन, कोल्हापूर, १९८३·

१६· शिंदे आबासाहेब — साताराचे प्रतिसरकार प्रसंग आणि व्यक्ति, उषा प्रकाशन, कोल्हापूर, १९८७·

१७· शिवणीकर राघव — साताराचा सिंह, श्रीराम बुक एजन्सी, पुणे, १९८१·

१८· सनदे सा·बा· — जीवन संग्राम राही प्रकाशन, आष्टा, द्वितिय आवृत्ती १९८४·

१९· साने गीता — भारतीय स्त्रीजीवन, मौज प्रकाशन गृह, मुंबई, १९८६·

२०· छोके मो·नि· श्रमिकांचा केवारी, पारख प्रकाशन, बेळगांव, १९८१·

२१· गाडगीळ मालती स्त्रीचे बंध, विमोचन, प्रागतिक पुस्तक प्रकाशन, पुणे, १९८१·

२२· गोखले-पटेल सुशिला स्त्री मुक्ती: केव्हा व कशी ? महिला अंदोलन पत्रिका प्रकाशन, मुंबई, १९८४·

२३· भारताचा स्वातंत्र्य संग्राम (प्रमुख प्रवाह, सामर्थ्य, कमजो-या)· समाजवादी प्रबोधन प्रकाशन, इचलकरंजी, १९८६·

२४· खेड्यातील गरीबांची फूज- क्रांतिसिंह मुक्त व्यासपीठ विटा·

२५· भारतीय इतिहास संशोधन आणि संस्कृती पत्रिका·


शोधनिबंध
--------


१· नलवडे दमयंती प्रतिसरकारच्या चळवळीतील स्त्रियांचा क्रान्तिकारक सहभाग· १९८७, शिवाजी विद्यापीठ, राज्यशास्त्र परिषद, सहावे अधिवेशन· इस्लामपूर

२· पाटील दिनकर साता-याचे प्रतिसरकार शोध आणि बोध· १९८७, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषद, सहावे अधिवेशन, इस्लापूर, १९८७·

३· पवार जे·के· साता-याचे प्रतिसरकार शोध आणि बोध, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषद, सहावे अधिवेशन, इस्लापूर, १९८७·

४· आम्व्हेट गेल स्त्रीवाद आणि भारतीय स्त्रियांची चळवळ, अप्रकाशित·